# जाहीर प्रकटन

दि.१६/१२/२०२१

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका हद्दीतील दि.३१/१२/२०२० पुर्वीची अनधिकृत बांधकामे नियमित करणेसाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ यात सुधारणा करुन अधिनियम दि.१२ मार्च २०२१ पारित केला असुन शुल्क निश्चितीसाठी शासन आदेश क्र.गुंठेवा-१०२१/प्र.क्र.-८५/२०८१/नवि-३०, दि.१८/१०/२०२१ पारित केलेला आहे.

या निवेदनाद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत मिळकत धारकांना आवाहन करणेत येते की, सदर शासन निर्णयानुसार दि.३१ डिसेंबर २०२० पुर्वीची अनधिकृत बांधकामे नियमित करणेसाठी महापालिकेकडे अर्ज करणेत यावेत.नियमितीकरणासाठीची माहिती मनपाच्या वेबसाईटवर (www.pcmcindia.gov.in) उपलब्ध आहे. तसेच सविस्तर अर्जाचे नमुने,आवश्यक कागदपत्रे या बाबतची सविस्तर माहिती गुंठेवारी बांधकामे नियमितीकरण General Information (सर्वसाधारण माहिती) मध्ये (unauthorised structure regularizations) या लिंकवर उपलब्ध आहेत. सदर अर्ज महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात स्विकारण्यात येणार आहेत. तसेच नागरीक स्वत: ही ऑनलाईन अर्ज करु शकतात. सदरचे अर्ज विहित कागदपत्रासह दि. २०/१२/२०२१ पासुन दि.२१/०२/२०२२ पर्यंत स्विकारण्यात येणार आहेत. तरी नागरीकांनी बांधकामे गुंठेवारी कायदयान्वये नियमित करण्यासाठी वरील मुदतीत लायसन्स इंजिनिअर / ला.आर्किटेक्ट मार्फत अर्ज सादर करावेत. दि.२१/०२/२०२२ नंतर प्राप्त आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व अशी बांधकामे निष्कासनास पात्र राहतील.

अ) खालील अनधिकृत बांधकामे नियमित करणेसाठी पात्र नाहीत.:-

१) Blue line निळया पुररेषेखालील बांधकामे / नदी पात्रातील बांधकामे.

२) विकास आराखड्यातील आरक्षणामधील बांधकामे.

३) विकास आराखड्यातील रस्त्यामधील बांधकामे

४) रेड झोन मधील बांधकामे.

५) बफर झोनमधील बांधकामे.

६) धोकादायक बांधकामे.

७) सरकारी जागेवर झालेली बांधकामे

८) शेती झोन / ग्रीन बेल्ट मधील बांधकामे

९) ना विकास झोन मधील बांधकामे

१०) नाला क्षेत्रातील बांधकामे

**ब) खालील प्रकारची बांधकामे नियमितीकरणास पात्र ठरतील.:-**

१) रहिवास व वाणिज्य क्षेत्रातील बांधकामे

२) दि.३१/१२/२०२० पुर्वी बांधुन पुर्ण झालेले बांधकाम

३) चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत राहून केलेले बांधकाम

(निर्देशांकापेक्षा अधिकचे बांधकाम स्वत:हुन निष्कासित केल्यास असे बांधकाम नियमितीकरणास पात्र राहील.)

क) बांधकामे नियमितीकरणासाठी खालील कागदपत्रे आवश्यक राहतील.:-

१) विहित नमुन्यातील अर्ज.
२) मालकी हक्कासाठी ७/१२ उतारा व तत्सम कागदपत्रे.
३) बांधकाम दि.३१/१२/२०२० पुर्वी बांधुन बांधकाम पुर्ण झालेबाबत करसंकलन विभागाचा दाखला
४) मान्यता प्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअरकडुन स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी दाखला, (२ मजल्यापेक्षा जास्त मजल्यांची इमारत असल्यास)
५) पाणीपुरवठा थकबाकी नसलेला दाखला
६) जलनि:सारण विभागाचा ड्रेनेज कनेक्शन दाखला
७) अर्जासोबत नकाशा सादर करताना इमारतीचा प्लॉन, क्रॉस सेक्शन, इलिव्हेशन, साईट प्लॉन / लोकेशन प्लॉन, खिडक्या व दरवाजे तक्ता व इतर माहिती नकाशात दर्शविणे आवश्यक राहील. नकाशावर मालक व ला.आर्किटेक्टची स्वाक्षरी बंधनकारक राहील.

ड) गुंठेवारी नियमितीकरणाची पद्धती.

महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेब पोर्टलवरील General Information (सर्वसाधारण माहिती) मध्ये Unauthorised structure regularisation या Link वर नागरीक, ला.आर्किटेक्ट मार्फत महानगरपालिकेच्या CFC Centre वर किंवा स्वत: ऑनलाईन अर्ज करु शकतील. महानगरपालिका त्यांची Primary छाननी करुन CFC Centre सदर अर्ज पुढे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडे पाठविण्यात येऊन त्यानंतर त्याची स्थळ पहाणीसह तांत्रिक छाननी होईल. त्यानंतर नकाशे मंजुर झाल्यावर आवश्यक ते प्रिमीयम / अधिमुल्य भरणा केल्यावर संबंधित क्षेत्रिय कार्यालयातर्फे नियमितीकरण दाखला व नकाशावर स्वाक्षरी करुन दाखला देणेत येईल. प्रस्तुत प्रकरणी अर्जासाठी रक्कम रु. १००/- इतके शुल्क CFC Centre वर आकरण्यात येईल.

इ) गुंठेवारी अधिनियमानुसार नियमित न होणारी बांधकामे निष्कासनास पात्र राहतील.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे – ४११०१८